# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

MMRDA
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
प्लॉट क्र.-५,६ व १२, ई-ब्लॉक वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. **दूरध्वनी : २६५९४०००**
**फॅक्स : २६५९१२६४** वेबसाइट : **https://mmrda.maharashtra.gov.in**

## नोटीस

### मुंबई महानगर प्रदेशासाठी प्रारूप प्रादेशिक योजना
### महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १६(१) अनुसार नोटीस

क्र.निवि/प्रायो/प्रसिध्द/३७०/२०१६

ज्याअर्थी, मुंबई महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतूदी चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ (२००० च्या महाराष्ट्र अधिनियम ५) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) अनुसार गठन करण्यात आलेल्या मुंबई महानगर नियोजन समितीस (यापुढे ज्याचा उल्लेख "एमएमपीसी" असा करण्यात आला आहे), उक्त अधिनियमाच्या कलम ९ अनुसार नगर विकास विभागाच्या अधिसूचना क्र. १८९९/११९१/प्र.क्र.८०/९९/नवि-१३, दि. २३/७/१९९९ अन्वये जाहिर केलेल्या मुंबई महानगर क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

२. ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या नियम-११ अन्वये सदर विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ मधील प्रादेशिक योजनेच्या तरतुदीनुसार तयार करणे आवश्यक आहे आणि शासनाचे अधिसूचना क्र. एमपीसी-२०१०/ प्र.क्र.-१२९/२०११/नवि-३०, दि. २३/०४/२०१२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३ अन्वये मुंबई महानगर प्रदेशाची स्थापना करण्यात आली आहे.

३. ज्याअर्थी, प्रादेशिक विकासाच्या नियोजन व समन्वय करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे ज्याचा उल्लेख MMRDA असा करण्यात आला आहे) स्थापना झाली आहे. या अधिनियमाच्या कलम १२, पोटकलम २ अनुसार प्राधिकरण मुंबई महानगर नियोजन समितीस मुंबई महानगर प्रदेशासाठीच्या विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रादेशिक योजना" म्हणून करण्यात आला आहे ) तयार करण्यामध्ये सहकार्य करावयाचे आहे. प्राधिकरणाने दि. २६/०८/२०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत केलेली ठराव क्र. १३४५ व्दारे मुं.म.प्र. वि. प्राधिकरणाने तयार केलेली प्रारूप "प्रादेशिक योजना" पुढील कार्यवाहीसाठी मुंबई महानगर नियोजन समितीस सादर करण्यासाठी मान्यता दिली आहे.

४. ज्याअर्थी, मुंबई महानगर नियोजन समितीच्या दि. ८ जुलै, २०१६ राजी झालेल्या तिसऱ्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या प्रारूप प्रादेशिक योजना समितीच्या कामकाजास पुरक स्वरूपाचे असल्याने सदर योजना स्वीकार करून त्यास मान्यता देण्यात आली आहे आणि सदर प्रादेशिक योजना २०१६-२०३६ या कालावधी करीता असेल व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या प्रकरण २ मध्ये नमूद केलेल्या कलम १६ च्या तरतूदीनुसार जसे प्रसिध्द करणे व इतर कार्यवाही करिता महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

५. म्हणून आता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १६, पोट कलम (१) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन या सूचनेद्वारे उक्त प्रदेशासाठी प्रारूप प्रादेशिक योजना प्रसिध्द करीत आहे. प्रारूप प्रादेशिक योजनेची एक प्रत महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नवीन इमारत , वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांच्या कार्यालयात कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात येत आहे.

प्रारूप प्रादेशिक योजनेच्या प्रती खालील कार्यालयांमध्ये सुध्दा कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळात जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध आहेत :-

(१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
(२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, मुंबई.
(३) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई.
(४) जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा, ठाणे.
(५) जिल्हाधिकारी, रायगड जिल्हा, अलिबाग.
(६) जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा, पालघर
(७) मुख्य कार्यकारी अधिकारी,ठाणे जिल्हा परिषद,ठाणे.
(८) मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग.
(९) महापालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई.
(१०) महापालिका आयुक्त,ठाणे महानगरपालिका,ठाणे.
(११) महापालिका आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
(१२) महापालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.
(१३) महापालिका आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका,भाईदर.
(१४) महापालिका आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
(१५) महापालिका आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
(१६) महापालिका आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार.
(१७) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई
(१८) सहाय्यक संचालक, नगररचना, रायगड जिल्हा, अलिबाग.
(१९) सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे जिल्हा, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.
(२०) सहाय्यक संचालक, नगररचना, पालघर जिल्हा, पालघर.

मुंबई महानगर प्रदेशातील खालील सर्व तहसिलदारांच्या कार्यालयांमध्ये जसे-
(२१) ठाणे, (२२) कल्याण, (२३) भिवंडी, (२४) उल्हासनगर, (२५) वसई, (२६) उरण, (२७) पनवेल, (२८) खालापूर, (२९) अलिबाग, (३०) पेण, (३१) कर्जत.

खालील नगरपरिषदांच्या कार्यालयांमध्ये -
(३२) अंबरनाथ, (३३) कुलगांव-बदलापुर, (३४) कर्जत, (३५) पनवेल, (३६) उरण, (३७) पेण, (३८) खोपोली, (३९) अलिबाग, (४०) माथेरान.

६.प्रारूप मुंबई महानगर प्रादेशिक योजनेच्या अहवाल, नकाशे व विकास नियंत्रण नियमावलीच्या प्रती या प्रमुख, नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नवीन इमारत, वांद्रे -कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांच्या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळात जनतेला विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

७.प्रारुप प्रादेशिक योजनेबाबत कोणतेही सुचना व हरकती हया ही सूचना राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ४ महिन्यांच्या आत प्रमुख, नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नवीन इमारत, ६ वा मजला, वांद्रे -कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ यांचेकडे कारणे व आधार नमूद करून व प्रादेशिक नियोजन समितीसमोर अर्जदार सुनावणीसाठी उपस्थित राहू इच्छितो किंवा कसे हे लेखी स्वरूपात पाठविण्यात याव्यात.

**ठिकाण : मुंबई** — **यु.पी.एस.मदान**
**दिनांक : १९ सप्टेंबर, २०१६** — **महानगर आयुक्त**

12x30 cm

**MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY**
(A Govt. of Maharashtra Undertaking)
MMRDA
**New Office Building, Plot No. 5, 6 & 12, E-Block, BKC, Bandra (East), Mumbai – 400 051.**
**Tel. No.2659 4000, Fax No.2659 1264 Website : https://mmrda.maharashtra.gov.in**

# NOTICE

## Draft Regional Plan for Mumbai Metropolitan Region
## Notice in accordance with section 16(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

**No.PD/RP/Publication/370/2016**

Whereas the Mumbai Metropolitan Planning Committee (hereinafter referred to as MMPC) constituted under Maharashtra Metropolitan Planning Committees (Constitution and Functions) (Continuance of Provisions) Act, 1999 (hereinafter referred to as "Said Act") is required to prepare Development Plan as per section 9 of the said act, for the Mumbai Metropolitan Area declared by the Govt. vide Notification no. 1899/1191/CR80/99/UD-13 dated 23/07/1999.

2. And whereas, as per Rule No. 11 of the Said Act, the Development Plan is to be prepared as per the procedure laid down in the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 in respect of the Regional Plans and the State Government vide Notification No. MPC-2010/CR-129/2011/UD-30 dated 23/04/2012 has established the Mumbai Metropolitan Region under section 3 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

3. And whereas, the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as "MMRDA") has been established under MMRDA Act, 1974 for planning and coordination of Development of the Mumbai Metropolitan Region and whereas under sub section 2 of section 12 of this act, MMRDA has to assist the Mumbai Metropolitan Planning Committee in preparation of the Development Plan (hereinafter referred to as "Regional Plan") and whereas MMRDA in its 138th meeting held on 26/08/2015, by Resolution no. 1345 has permitted to forward the Regional Plan prepared by MMRDA to the Mumbai Metropolitan Planning Committee for further actions.

4. And whereas, Mumbai Metropolitan Planning Committee in its 3rd meeting held on 08/07/2016 has accepted and approved the Regional Plan prepared by MMRDA, and fixed the Regional Plan period as 2016-2036 and authorized the Metropolitan Commissioner, MMRDA to publish and take other actions as mentioned in section 16 of Chapter 2 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

5. Now therefore, in exercise of the powers under sub section 1 of section 16 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, gives this notice and publishes the Draft Regional Plan prepared for the notified area. The Draft Regional Plan is available for public inspection at the office of the Metropolitan Commissioner, MMRDA, New Building, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai- 400 051 during office hours on any working day.

Copies of the Draft Regional Plan are also available for inspection to the public in the following offices during office hours on any working day.

1. Divisional Commissioner, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai
2. Collector, Mumbai District, Mumbai
3. Collector, Mumbai Suburban District, Bandra (E.), Mumbai
4. Collector, Thane District, Thane
5. Collector, Raigad District, Alibag
6. Collector, Palghar District, Palghar
7. Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane
8. Chief Executive Officer, Zilla Parishad, Raigad, Alibag
9. Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Mumbai, Mumbai
10. Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane
11. Municipal Commissioner, Kalyan Dombivali Municipal Corporation, Kalyan
12. Municipal Commissioner, Navi Mumbai Municipal Corporation, Navi Mumbai
13. Municipal Commissioner, Mira Bhayander Municipal Corporation, Bhayander
14. Municipal Commissioner, Bhiwandi Nizampur City Municipal Corporation, Bhiwandi
15. Municipal Commissioner, Ulhasnagar Municipal Corporation, Ulhasnagar
16. Municipal Commissioner, Vasai Virar City Municipal Corporation, Virar
17. Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Navi Mumbai
18. Assistant Director of Town Planning, Raigad District, Alibag
19. Assistant Director of Town Planning, Thane District, Collector's Office, Thane
20. Assistant Director of Town Planning, Palghar District, Palghar.

In the offices of the Tehsildars in Mumbai Metropolitan Region, namely -
(21) Thane, (22) Kalyan, (23) Bhiwandi (24) Ulhasnagar, (25) Vasai, (26) Uran, (27) Panvel, (28) Khalapur, (29) Alibaug, (30) Pen, (31) Karjat

In the offices of Municipal Councils of -
(32) Ambernath, (33) Kulgaon Badlapur, (34) Karjat, (35) Panvel, (36) Uran, (37) Pen, (38) Khopoli, (39) Alibaug, (40) Matheran.

6. Copies of the report of the Draft Regional Plan, Map and the Draft Development Control Regulations will be available for sale to the public at the office of the Chief, Planning Division, MMRDA, New Building, 6th floor, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai- 400 051.

7. Any objection or suggestion with respect to the Draft Regional Plan may be sent in writing to the Chief, Planning Division, MMRDA, New Building, 6th floor, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai- 400 051 within a period of 4 months from the date of publication of this notice in the Official Gazette and any such objection or suggestion should state the grounds on which it is made and whether the applicant desires to be heard by the Regional Planning Committee.

Date : 19.09.2016
Place : Mumbai

**U.P.S. Madan**
**Metropolitan Commissioner**

**Size : 12 x 28**